# विवादास्पद मजकुराच्या निषेधार्थ 'रामचरितमानस'चे दहन

## समाजवादी पक्षात या मुद्यावर दुफळी

**लखनौ : प्रतिनिधी**

'रामचरितमानस' या धार्मिक ग्रंथात विवादास्पद टिप्पणी करण्यात आली असून हा भाग वगळावा, या समाजवादी पक्षाचे नेते स्वामीप्रसाद मौर्य यांच्या मागणीच्या समर्थनार्थ अखिल भारतीय ओबीसी महासभेच्या वतीने ग्रंथाचे दहन करण्यात आले. विवादास्पद भाग वगळला जात नाही तोपर्यंत आंदोलन सुरूच राहील, असा इशारा महासभेने दिला आहे.

मागील काही काळापासून रामचरितमानस हा ग्रंथ विवादाचे केंद्रस्थान बनला आहे. सर्वप्रथम बिहारचे मंत्री चंद्रशेखर यांनी या ग्रंथातील मजकुरावर आक्षेप घेऊन वादाला तोंड फोडले. त्यानंतर कर्नाटकातील एका निवृत्त प्राध्यापकांनीही या ग्रंथात आक्षेपार्ह मजकूर असल्याच्या टीकेला दुजोरा दिला. आता मौर्य यांनी या ग्रंथाच्या विरोधात आघाडी उघडली आहे.

या ग्रंथात महिला, दलित आणि बहुजन समाजाच्या विरोधात मजकूर असल्याचा आक्षेप घेतला जात आहे. अशाच मजकुराच्या आधारावर देशातील १५ टक्के लोक ८५ टक्के लोकांना अडाणी ठरवून त्यांच्या प्रगतीत अडथळा निर्माण करत आहेत. त्यामुळे असा मजकूर या ग्रंथातून वगळण्यात यावा, अशी महासभेची मागणी आहे. भारतीय घटनेत दुरुस्ती होऊ शकते तर रामचरितमानस सारख्या ग्रंथात सुधारणा का होऊ शकत नाही, असा सवालही त्यांनी केला आहे.

मौर्य यांना या विषयावर मोठे समर्थन मिळताना दिसून येत आहे. भारतीय जनता पक्ष मौर्य यांच्या विरोधात रस्त्यावर उतरला आहे. खुद्द समाजवादी पक्षाचे काही नेतेही या मुद्द्यावर मौर्य यांचा विरोध करीत आहेत.



# मृत्यूला सामोरे जाऊ पण भाजपबरोबर जाणार नाही

- मोदी, शहांच्या कारभारावर नितीश कुमार यांचा आक्षेप

**पाटणा : प्रतिनिधी**

एक वेळ आपण मरणाला सामोरे जाऊ पण भारतीय जनता पक्षाबरोबर जाण्याची चूक पुन्हा करणार नाही, अशी स्पष्टोक्ती बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या कारभारावर त्यांनी टीका केली. या दोघांच्या नेतृत्वाखालचा भाजप बदलला असल्याची टीकाही त्यांनी केली.

माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्याबद्दल आपल्या मनात अपार आदर आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली काम करणे समाधान देणारे होते. त्यांनी देशासाठी भरीव कामगिरी केली आहे. सध्याचा भाजप आणि मोदी, शहांचा भाजप यांच्यात फरक आहे. नव्या भाजपाला साथ देण्याची चूक पुन्हा कदापि करणार नाही, असे ते म्हणाले.

पुढच्या निवडणुकांमध्ये भाजपविरोधी पक्षांची एकजूट व्हावी, अशी अपेक्षा नितीश कुमार यांनी व्यक्त केली. आम्ही भाजपबरोबर असताना त्यांना अल्पसंख्य समाजाची मते मिळायला लागली. त्याच जोरावर ते मोठ्या प्रमाणात जागा जिंकू शकले. आता मात्र त्यांना याचा सोईस्कर विसर पडला आहे, अशी टीकाही त्यांनी केली.

# पाकिस्तान हादरलं! मशिदीत बॉम्बस्फोट, २८ जणांचा मृत्यू

## १५० पेक्षा जास्त लोक जखमी; जखमींवर उपचार सुरू



**पेशावर : वृत्तसंस्था**

पाकिस्तानमधील पेशावरमध्ये मशिदीत बॉम्बस्फोट झालाय. येथील पोलीस वसाहतीमधील मशिदीमध्ये भाविक नमाज पठण करत होते, त्यावेळी अचानक बॉम्बस्फोट झाल्याचं वृत्त आहे. या बॉम्बस्फोटात २८ जणांचा मृत्यू झाला आहे तर १५० जण जखमी आहेत. जखमींना उपचारासाठी जवळील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनास्थळावर पोलीस आणि तपास यंत्रणा पोहचल्या असून तपास सुरु आहे. या हल्ल्याची जबाबदारी अद्याप कोणत्याही दहशतवादी संघटनेनं घेतलेली नाही.

स्थानिक मीडिया रिपोर्ट्सनुसार, बॉम्बस्फोट झाल्यानंतर मशिदीचं छत कोसळलं आहे. नमाज सुरु असताना हल्लेखोरानं बॉम्बनं स्वत:ला उडवलं. या हल्ल्यातील मृताची संख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे.

डॉनच्या वृत्तानुसार, बॉम्बस्फोटामुळे मशिदीचा बराचसा भाग कोसळला आहे. त्यामुळे ढिगाऱ्याखाली अनेक भाविक अडकले असल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

या स्फोटानंतर पोलीस आणि स्थानिक प्रशासनाचं पथक घटनास्थळी दाखल झाले आहे. मशिदीमध्ये सध्या बचावकार्य सुरू आहे. त्याशिवाय जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात येत आहे.

मिळालेल्या वृत्तानुसार, मृतामध्ये दोन पोलीस कर्मचाऱ्याचाही समावेश आहे. रॉयटर्सनं दिलेल्या वृत्तानसुरार, आज दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास मशिदीत नमाज पठण सुरु असताना एका हल्लेखोरानं स्वत:ला बॉम्बने उडवून घेतले.

बॉम्बस्फोटात २८ जणांचा मृत्यू झालाय. तर १५० पेक्षा जास्त जण जखमी झाले आहेत. ढिगाऱ्याखाली अनेक लोक अडकले आहेत. त्यामुळे मृताची संख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे. बॉम्बस्फोटात जखमी झालेल्या लोकांना तात्काळ जवळच्या लेडी रीडिंग रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात येत आहे.

# पाचव्या राष्ट्रीय युवा क्रीडा स्पर्धांना सुरुवात

## क्रीडा मंत्री गिरीश महाजन यांनी दिल्या शुभेच्छा

**मुंबई : प्रतिनिधी**

मध्य प्रदेशची राजधानी भोपाळ येथे आजपासून पाचव्या राष्ट्रीय युवा क्रीडा स्पर्धांना सुरुवात होत आहे. यानिमित्त महाराष्ट्राच्या संघाला क्रीडा व युवक कल्याण मंत्री गिरीश महाजन यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच महाराष्ट्राचा संघ या स्पर्धेत पदकांचे त्रिशतक पूर्ण करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

महाजन यांनी म्हटले आहे, दोन वेळेचा विजेता महाराष्ट्र संघ पाचव्या 'खेलो इंडिया' युवा क्रीडा स्पर्धेत पदकांची विक्रमी कमाई करण्यासाठी सज्ज आहे. खो- खो स्पर्धेत पुरुष व महिला संघ चार वेळेस अजिंक्य ठरले असून महाराष्ट्राच्या खो-खो संघांना विजयी सलामीची संधी आहे.

**२२ क्रीडा प्रकारांत महाराष्ट्राचे ३७७ खेळाडू सहभागी**

या स्पर्धेच्या २२ क्रीडा प्रकारांत महाराष्ट्राच्या एकूण ३७७ सदस्यांचा संघ सहभागी होत आहे. यामध्ये टेबल टेनिस, खो- खो, बॉक्सिंग, बास्केटबॉल, बॅडमिंटन, तिरंदाजी, नेमबाजी, कयाकिंग व कनोइंग, योगासन, गटका, सायकलिंग ट्रॅक, अॅथलेटिक्स, कबड्डी, वेटलिफ्टिंग, लॉन टेनिस, मल्लखांब, तलवारबाजी, कुस्ती आणि जलतरण या क्रीडा प्रकारांचा समावेश आहे.

**दोन वेळेस महाराष्ट्र संघ अजिंक्य**

आतापर्यंत दोन वेळेस महाराष्ट्राने २०० पेक्षा अधिक पदकांची कमाई केली आहे. त्यामुळे महाराष्ट्र संघाचे लक्ष्य आता या स्पर्धेत पदकांचे त्रिशतक साजरे करण्यावर असेल. महाराष्ट्राच्या युवा खेळाडूंची केंद्रीय क्रीडा मंत्रालयाच्या वतीने आयोजित 'खेलो इंडिया' क्रीडा स्पर्धांमधील कामगिरी उल्लेखनीय ठरलेली आहे. गुणवंत युवा खेळाडूंनी २०१९ आणि २०२० मध्ये महाराष्ट्राला अजिंक्यपदाचा बहुमान मिळवून दिला आहे. २०२० मध्ये गुवाहाटी येथे झालेल्या स्पर्धेदरम्यान महाराष्ट्र संघाने विक्रमी २५६ पदकांची कमाई केली आहे. त्यात महाराष्ट्राच्या संघाने ७८ सुवर्ण पदके पटकावली होती. २०१९ मध्ये पुणे येथील स्पर्धेत महाराष्ट्र संघ २२८ पदकांसह सर्वसाधारण विजेतेपदाचा मानकरी ठरला होता.





**महाराष्ट्र सर्वसाधारण विजेतेपद मिळवेल : क्रीडा आयुक्त**

गुजरात येथील राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा आणि महाराष्ट्र राज्य ऑलिम्पिक स्पर्धे दरम्यान युवा खेळाडूंनी यश संपादन केले आहे. याच कामगिरीत सातत्य ठेवत महाराष्ट्राचे खेळाडू मध्य प्रदेशातील खेलो इंडिया यूथ गेम्समध्ये यश संपादन करतील. पुण्यात आयोजित सराव शिबिरातून हे खेळाडू तज्ज्ञ प्रशिक्षक आणि अत्याधुनिक सुविधांच्या माध्यमातून आपल्या गुणवत्तेचा दर्जा उंचावत आहेत. त्यामुळे महाराष्ट्र संघ निश्चितपणे या स्पर्धेदरम्यान सर्वसाधारण विजेते पदाचा मानकरी ठरेल, असा विश्वास क्रीडा आयुक्त डॉ. सुहास दिवसे यांनी व्यक्त केला.

# राहुल गांधींचं बर्फवृष्टीत वादळी भाषण; भारत जोडो यात्रेचा समारोप

## शरद पवारांच्या भर पावसातील भाषणासोबत होतेय तुलना

**जम्मू :** वादळी बर्फवृष्टी दरम्यान सोमवारी काँग्रेसच्या भारत जोडो यात्रेचा समारोप झाला. यावेळी काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी बर्फवृष्टी होत असताना कार्यकर्त्यांना संबोधित केलं आहे. त्यांचं हे बर्फवृष्टी दरम्यान सुरु असलेलं भाषण पाहून अनेक नेटकऱ्यांना राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी भर पावसात केलेल्या भाषणाची आठवण झाली. समारोप सभेत बोलताना राहुल गांधी म्हणाले की, ''येथे तैनात असलेल्या सीआरपीएफ, बीएसएफ आणि लष्कराच्या जवानांना सांगू इच्छितो की मला हिंसा काय असते हे समजतं.




पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शाह आणि आरएसएसचे लोक हे समजू शकत नाहीत. आम्ही इथे चार दिवस फिरलो. भाजपचा कोणताही नेता असा येथे चालणार नाही, याची मी खात्री देतो. जम्मू-काश्मीरचे लोक त्यांना फिरू देणार नाहीत म्हणून नाही, तर ते घाबरले आहेत.''

राहुल गांधी म्हणाले की, ''जेव्हा मी १४ वर्षांचा होतो आणि शाळेत भूगोलाच्या वर्गात बसलो होतो, तेव्हा माझे एक शिक्षक जवळ आले आणि म्हणाले की तुम्हाला मुख्याध्यापकांनी बोलावले आहे. मी मुख्याध्यापकांकडे पोहोचलो तेव्हा त्यांनी सांगितले की, घरून फोन आला आहे. मी फोन घेतला आणि फोनवर बोललो तेव्हा माझ्या आईसोबत काम करणारी बाई जोरात ओरडली, राहुल... आजीला गोळी लागली आहे.'' याबाबत बोलताना ते पुढे म्हणाल, ''मी हे जे बोलत आहे, ते पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांना समजणार नाही. पण काश्मीरचे लोक, आर्मी आणि सीआरपीएफचे लोक ते समजू शकतात. पुलवामामध्ये शहीद झालेल्या जवानांच्या मुलांना काय वाटत असेल. येथे काश्मिरी लोक मारले जातात, तेव्हा काय वाटत असेल, हे मला आणि माझी बहिणीला चांगलं समजतं.''

देशाचा पाया असलेली विचारधारा मजबूत करण्यासाठी आम्ही ही यात्रा काढल्याचे राहुल गांधी म्हणाले. ते म्हणाले, मला माहीत आहे की जर आपण प्रेमाने उभं राहत सर्वांशी प्रेमानं बोललो तर आपण यशस्वी होऊ. आम्ही त्यांच्या विचारसरणीचा पराभव तर करूच, पण ती त्यांच्या मनातून काढूनही टाकू. ते म्हणाले, माझ्याकडे स्वतःचे घर नाही, मी सरकारी घरात राहिलो आहे. घर ही माझ्यासाठी राहण्याची आणि विचार करण्याची पद्धत आहे. ते म्हणाले की, लोक ज्याला काश्मिरियत म्हणतात, त्याला मी माझे घर मानतो.

# सूर्याहून हजारो पट अधिक लख्ख प्रकाश

## अंतराळातील आणखी एक रहस्य, 'मॅग्नेटॉर' पाहून शास्त्रज्ञही अवाक्

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

अंतराळामध्ये अनेक रहस्य लपली आहेत, ज्याची अद्याप संपूर्ण जगाला कल्पनाही नाही, जगभरातील शास्त्रज्ञांकडून या अवकाशातील रहस्यांचा उलगडा करण्यासाठी बरेच संशोधन सुरु आहे. काही दिवसांपूर्वी शास्त्रज्ञांनी पृथ्वीसारख्या दिसणाऱ्या एका ग्रहाचा शोध लावला होता, आता शास्त्रज्ञांनी आणखी एका रहस्याचा उलगडा केला आहे. सूर्याहून हजारो पटींनी जास्त लख्ख आणि तेजस्वी असणारा प्रकाश स्त्रोत शास्त्रज्ञांनी शोधला आहे. शास्त्रज्ञांच्या मते, हा प्रकाश आपल्या आकाशगंगेतील सर्व ताऱ्यांच्या ऊर्जेहूनही कैकपटीने जास्त ऊर्जा उत्सर्जित करतो.



या चमकदार प्रकाश स्त्रोतातून इतकी ऊर्जा बाहेर पडतेय की, ती उघड्या डोळ्यांनी पाहता येणार नाही. शिवाय, या प्रकाशाचे पृथ्वीपासूनचे अंतरही खूप आहे. काही शास्त्रज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार, ही प्रकाश स्त्रोत काही गरम वायूंचा मोठा गोळा आहे, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. पण वैज्ञानिकांना हा प्रकाश स्त्रोत नेमका काय आहे, याबाबत स्पष्टता आलेली नाही.

**सूर्यापेक्षा ५७ हजार कोटी पट अधिक तेजस्वी प्रकाश**

पृथ्वीपासून सुमारे ३८० दशलक्ष प्रकाशवर्षे दूर अंतराळात शास्त्रज्ञांना सूर्यापेक्षा ५७ हजार कोटी पट अधिक तेजस्वी प्रकाश स्त्रोत सापडला आहे. हा सुपरनोव्हाहूनही २० पटीने अधिक चमकदार आहे. एखाद्या ताऱ्याचं आयुष्य संपत, तेव्हा त्याचा मोठा स्फोट होतो. यावेळी अंतराळामध्ये मोठी ऊर्जा आणि प्रकाश उत्सर्जित होतो, यालाच सुपरनोव्हा असं म्हणतात. शास्त्रज्ञांनी शोधलेला नवा प्रकाश स्त्रोत अशा २० सुपरनोव्हाहून जास्त लख्ख आणि तेजस्वी आहे, असं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे.

**काही शास्त्रज्ञांच्या मते, हा प्रकाश स्त्रोत एक सुपरनोव्हा**

काही शास्त्रज्ञांच्या मते, हा प्रकाश स्त्रोत एक सुपरनोव्हा आहे. सुपरनोवाला मॅग्नेटार (चरसपशींरअॅ) असंही म्हणतात. वैज्ञानिकांच्या मते, आतापर्यंत शोधलेल्या सर्व मॅग्नेटॉरपैकी हा सर्वात चमकदार आणि सर्वाधिक ऊर्जा देणारा मॅग्नेटॉर आहे. ओहायो स्टेट विश्वविद्यालयातील अॅस्ट्रोनॉमीचे प्राध्यापक क्रिजिस्तॉफ स्तानेक यांनी सांगितले की, जर हा सापडलेला प्रकाश स्त्रोत मॅग्नेटॉर असेल तर, याची ऊर्जा १ ते १० च्या स्केलहून जास्त म्हणजे, ११ वर आहे.

**आतापर्यंत सापडलेला सर्वात शक्तिशाली मॅग्नेटॉर**

शास्त्रज्ञांच्या मते, हा मॅग्नेटार आतापर्यंत सापडलेला सर्वात शक्तिशाली मॅग्नेटॉर आहे. आतापर्यंत या प्रकारचा कोणताही सुपरनोव्हा सापडलेला नाही. शास्त्रज्ञांनी या मॅग्नेटारला ASASSN-15lh असे नाव दिले आहे. हा सामान्य सुपरनोव्हापेक्षा २०० पट अधिक प्रकाशमान आहे. शास्त्रज्ञांनी सांगितले की, जरी आपण आपल्या आकाशगंगेतील सर्व ताऱ्यांची चमक एकत्रित केली हा सुपरनोव्हा २० पट अधिक प्रकाशमान आहे.

# मराठ्यांची विजयगाथा सांगणारा 'बलोच'!

- प्रवीण तरडे झळकणार मुख्य भूमिकेत
- 'बलोच' हा सिनेमा लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे

**मुंबई : प्रतिनिधी**

सीमेपार लढलेल्या मराठ्यांची विजयगाथा सांगणाऱ्या 'बलोच' चित्रपटाविषयी अनेकांना उत्सुकता लागली आहे. पानिपतच्या पराभवानंतर बलुचिस्तानातील गुलामगिरीत होरपळलेले मराठे तसेच तिथले भयाण वास्तव आता लवकरच पडद्यावर दिसणार आहे. प्रकाश पवार दिग्दर्शित 'बलोच' (इरश्रेलह) या चित्रपटाचे नवीन पोस्टर आता प्रेक्षकांच्या भेटीला आले आहे.

'बलोच' हा चित्रपट येत्या ५ मे रोजी सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात प्रवीण विठ्ठल तरडे (झअॅरींळप ढरअॅवश) मुख्य भूमिकेत आहेत. पोस्टरमधील प्रवीण तरडे यांचे रौद्र रूप विशेष लक्षवेधी ठरत आहे. त्यांच्या नजरेतून क्रोध व्यक्त होत आहे. 'बलोच'च्या माध्यमातून पुन्हा एकदा ऐतिहासिक आठवणींना उजाळा मिळणार आहे.



आजवर देशांसाठी लढलेल्या अनेक वीर मराठ्यांची कहाणी, लढाई रुपेरी पडद्यावर दाखवण्यात आली आहे. अशीच इतिहासातील लक्षात राहणारी लढाई म्हणजे पानिपतची. पानिपतच्या पराभवानंतर मराठ्यांना बलुचिस्तानात गुलामगिरी पत्करावी लागली होती. मराठ्यांनी लढलेल्या या अपरिचित लढ्याची शौर्यगाथा 'प्रेक्षकांना 'बलोच'मध्ये पाहायला मिळणार आहे.

'बलोच' या सिनेमाची कथा, पटकथा प्रकाश पवार यांची आहे. हा सिनेमा २०२२ मध्ये दसऱ्याच्या शुभमुर्हूर्तावर प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'बलोच'च्या निमित्ताने पुन्हा एकदा इतिहासातील आठवणींना उजाळा मिळणार आहे. सीमेपार लढलेल्या मराठ्यांची विजयगाथा डोळ्यांसमोर उभी करणारा धगधगता सिनेमा म्हणजे 'बलोच'.

प्रवीण तरडे यांचा 'दे धक्का २' आणि 'धर्मवीर मुक्काम पोस्ट ठाणे' या सिनेमांनी गेल्या वर्षात चांगलाच धुमाकूळ घातला. दोन्ही सिनेमे प्रेक्षकांच्या पसंतीस उतरले होते. त्यामुळे आता चाहत्यांना त्यांच्या नव्या सिनेमाची उत्सुकता लागली आहे.